
# मानवी हक्क आयोग

- मानवी हक्क म्हणजे काय?
- मानवी हक्क आयोगाच्या स्थापनेचे उद्दिष्ट
- मानवी हक्क आयोगाकडे कुणाविरूद्ध तक्रार करता येते?
- मानवी हक्क आयोगापुढे तक्रार कोणाला करता येते?
- मानवी हक्क आयोगाकडे असणारी ताकद

ॲड. अरूण देशमुख



Scanned by CamScanner

# मनोगत

आपल्यासमोर मानवी हक्क आयोगाचे हे पुस्तक आणताना मला मनापासून आनंद वाटत आहे. ह्या पुस्तकाचा विषय मनोरमाच्या श्री. अनिल फडके यांनी माझ्यासमोर मांडला व या विषयावर पुस्तक लेखन करण्याविषयी सुचविल्यामुळेच ह्या पुस्तकाचा जन्म झालेला आहे. मनोरमाच्या श्री. अनिल फडके यांचेमुळे ही लेखनाची संधी मला मिळाली असून त्यांच्या ह्या पाठिंब्यामुळेच माझी साहित्य सेवा अखंडीत चालू ठेवता येत आहे व त्यासाठी मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

भारतात जसा माहितीचा अधिकारासारखा एक लोकोपयोगी कायदा अस्तित्वात आहे तसाच किंबहुना महत्त्वाचा पण लोकांपर्यंत तसा जास्त न पोहोचलेला कायदा म्हणजे मानवी हक्क संरक्षण कायदा. हा कायदा १९९३ सालापासून अस्तित्वात आला. आपला देश हा एक प्रचंड मोठी लोकसंख्या असणारा एक देश असून सरकारी कर्मचाऱ्यांची संख्याही देशात तेवढीच मोठी आहे. आपल्या देशात जरी लोकशाही असली तरी खऱ्या अर्थाने नोकरशाहीच हा देश चालवते. अशा ह्या सर्व निवडून आलेल्या मंत्रीमहोदय, खासदार, आमदार इ. तसेच सर्व सरकारी, निमसरकारी नोकरशहांना मानवी हक्क संरक्षण कायद्यामध्ये लोकसेवक मानले जाते.

कोणत्याही लोक सेवकांद्वारे मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास किंवा त्यास प्रोत्साहन दिल्यास किंवा त्याकडे दुर्लक्षित केल्यास, मानवी हक्क आयोगाकडे तक्रार दाखल करता येते. स्वातंत्र्याअगोदर व नंतर काही वर्षे हा कायदा म्हणजे दलीत-पददलीत लोकांच्यासाठीच जसा काही वापरला जात होता. अनुसुचित जाती व जमातींची सरकारी नोकऱ्यांमध्ये तेव्हा तेवढी भरती नसायची त्यामुळे त्यांना क्षुल्लक गोष्टींसाठीही अडलेनडले जायचे. त्यांचा हक्क असतानाही त्यांच्या हक्काची पायमल्ली केली जायची. शुद्रांपासून ते हरिजनांपर्यंत तसेच अल्पसंख्यांकांवर व महिलांवर होणाऱ्या अत्याचारासाठी ह्या कायद्याचा सर्रास वापर केला जायचा. अगदी ख्रिस्ती बांधवांचे चर्च उद्‌ध्वस्त झाले की बोंब व्हायची मानवी हक्काची पायमल्ली होत आहे ह्याचीच.



Scanned by CamScanner

मात्र गेल्या काही वर्षांपासून मानवी हक्क आयोगाकडे सामान्य माणूस त्याच्यावर सरकारी अधिकाऱ्याने जर अन्याय केला असेल तर त्याविरूद्ध दाद मागू लागला आहे. मा. राज ठाकरे हे मराठी माणसांकरीता लढा देत असताना त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांना ह्याच लोकशाहीतील सेवकांतर्फे दिला जाणारा त्रास सर्वश्रुतच आहे. कोणा वरिष्ठांच्या सांगण्यावरून खऱ्या खोट्या केसेस बनवत विरोधी पक्षातील कार्यकर्त्यांना त्रास देणे म्हणजेच लोकशाही की काय असे किंबहुना वाटू लागले आहे. अर्थात हे लोण आहे दक्षिणी राज्यांचेच. ज्याची सत्ता तो इतरांना त्रास देत सुटतो. अशावेळी तो त्रास देणारा असतो सरकारी अधिकारीच. अशा वेळेस दाद मागायची कुठे तर ती मानवी हक्क आयोगाकडेच. असो.

काही वर्षांपूर्वी गुन्हेगारांना थेट खऱ्या खोट्या चकमकी घडवत उडविले जात होते. म्हटले तर गुन्हेगार कमी होत होते मात्र त्यासाठीचा हा मार्ग अयोग्यच होता. हे सरळ सरळ मानवी हक्कांचे उल्लंघन होते. कोणताही आरोपी गुन्हा शाबीत होईस्तोवर गुन्हेगार ठरत नाही व त्याला शिक्षा ही सुद्धा कायद्याने विहित केल्यानुसारच द्यावयाची असते. त्यामुळेच भारतात खऱ्या अर्थाने लोकशाही आहे असे आपण मानतो.

मानवी मूल्य, मानवी हक्क हे काळानुरूप बदलत जातात. आज जागरूकता वाढल्याने स्त्रीयांच्या बाबतीतल्या कायदे व हक्कांमध्ये वाढच होत आहे. जे काल दुर्बळ होते ते आज सजग व बलवान होत आहेत. अर्थात सर्व काही आलबेल आहे असे नक्की नाही. आधुनिक युगामध्ये नवीन प्रकारेही सामान्य हक्कांची पायमल्ली होताना दिसते. उदा. राजकीय पक्ष दूरचित्रवाणींच्या चॅनलच्या साक्षीने कोणतरी एका अधिकाऱ्याच्या तोंडाला काळे फासतो, किंवा गुन्हा शाबीत होण्याअगोदरच दूरचित्रवाणींच्या चॅनलच्या माध्यमातून सवंग बातमीच्या लालसेपायी एखाद्या व्यक्तिस गुन्हेगार म्हणून प्रसिद्ध केले जाते. हे सर्व चूक आहे हे समजून उमजून जेव्हा चुका केल्या जातात तेव्हा हे आधुनिक वस्त्रहरणात सामान्य मानवी हक्कांची पायमल्ली होत असते.

मानवी हक्क आयोग जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर विविध पातळ्यांमध्ये काम करते. सदर कायद्याचा सर्वसामान्य



Scanned by CamScanner

व्यक्तींनी आपल्या मानवी हक्कांचे संरक्षणासाठी जरूर वापर करावा असे जाता जाता सांगावेसे वाटते. या पुस्तकाद्वारे मानवी हक्कांचे माझ्या परीने असणारे हक्क सोप्या भाषेत विषद केलेले आहेत. अर्थात यात चुकीने काही गोष्टींचा उल्लेख राहून गेला असल्यास आपण त्याबाबत लेखक या नात्याने मला जरूर कळवा त्यात या पुस्तकाच्या पुढील आवृत्तीत योग्य अशा सर्व गोष्टी अंर्तभूत करायचा प्रयत्न मी करीन.

हे पुस्तक प्रकाशनास जातेवेळी माझ्या सासू कै. कल्पना शशिकांत जोशी ह्यांचे हृदयविकाराने अकाली निधन झाले. माझ्या सासूंनी चार मुलींना पतिच्या अकाली निधनानंतर लहानाचे मोठे कष्टाने केले. त्यांना निवृत्त होऊन मुलींबरोबर, जावयांबरोबर व नातवंडांबरोबर अजून आनंद मिळायला पाहिजे होता असे राहून राहून वाटते. असो. हे पुस्तक मी त्यांना अर्पण करीत आहे.

हे पुस्तक सामान्य नागरीकांना त्यांना असणाऱ्या हक्कांची जाणीव करून देण्यास नक्कीच उपयोगी ठरेल अशी मला आशा वाटते. वाचक म्हणून आपले माझ्यावरचे प्रेम यापुढेही असेच वाढत राहील अशीच ईश्वर चरणी प्रार्थना करून मी माझे मनोगत इथेच संपवतो. हरि ओम...

ॲड. अरूण गोविंद देशमुख



Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका

प्रकरण I : मानवी हक्क म्हणजे काय ? —— १७ - २०
अ. मानवी हक्क
ब. मानवी हक्काबाबत इतिहास
क. संयुक्त राष्ट्र संघटनेची घोषणा
ड. आपल्या देशात मानवी हक्क आयोगाची स्थापना
इ. मानवी हक्कांबाबत सामाजिक स्थिती

प्रकरण II : मानवी हक्क आयोगाच्या स्थापनेचे उद्दिष्ट —— २१ - २६
अ. मानव अधिकार विश्व घोषणा पत्र
ब. संयुक्त राष्ट्र संघाचा कृती कार्यक्रम
क. मानवी हक्क संरक्षणाबाबत कायदा
ड. भारतीय संविधानातील शैक्षणिक अधिकार
इ. अस्पृश्यता नष्ट करणे
फ. कामगारांकरता निर्वाह वेतन
ग. कामगार कायदे
ह. आरक्षण
य. व्याख्या

प्रकरण III : मानवी हक्क आयोगाकडे कुणा विरूद्ध तक्रार करता येते ? —— २७ - २८
अ. यांच्या विरूद्ध तक्रार करता येते
ब. आयोगाच्या अधिकारीतेच्या अधिन नसणाऱ्या बाबी
क. विशेष अन्वेषण पथकाची रचना
ड. सद्हेतूने केलेल्या कृतीला संरक्षण



Scanned by CamScanner

प्रकरण IV : राष्ट्रीय मानवी हक्क आयोग —————— २९ - ३३
अ. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग स्थापना
ब. सभापतीस्थ व्यक्तींची आणि अन्य सदस्यांची नेमणूक
क. आयोगाच्या सदस्याला पदावरून दूर करणे
ड. सदस्याच्या पदाचा कालावधी
इ. विशिष्ट परिस्थितीत सदस्याने सभापतीपदस्थ व्यक्ती म्हणून काम करणे किंवा अशा पदाची कर्तव्ये पार पाडणे
फ. सदस्याच्या सेवेच्या अटी व शर्ती
ग. पद रिक्त असणे इत्यादीमुळे आयोगाची कार्यवाही बेकायदेशीर ठरणार नाही
ह. आयोगाने नियमित करावयाची कार्यपद्धती
य. आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग

प्रकरण V : राज्य मानवी हक्क आयोग —————— ३४ - ३८
अ. राज्य मानवी हक्क आयोगाची रचना
ब. राज्य आयोगाच्या सभापतीपदस्थ व्यक्तीची व अन्य सदस्यांच्या नेमणूका
क. राज्य आयोगाच्या सदस्याला पदावरून दूर करणे
ड. राज्य आयोगाच्या सदस्यांच्या पदाचा कालावधी
इ. सदस्याने सभापतीपदस्थ व्यक्ती म्हणून काम करणे किंवा विशिष्ट परिस्थितीत कर्तव्ये पार पाडणे.
फ. राज्य आयोगाच्या सदस्याच्या सेवेच्या अटी व शर्ती
ग. राज्य आयोगाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी वर्ग
ह. राज्य आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल
य. राष्ट्रीय मानवी हक्क संरक्षणाची आयोगाशी संबंधीत विशिष्ट तरतुदी राज्य आयोगाला लागू असणे

प्रकरण VI : मानवी हक्क आयोगाला असणारे अधिकार— ३९ - ४३
अ. मानवी हक्क संरक्षण कायद्यानुसार काम करणाऱ्या आयोगाला कोणते अधिकार आहेत ?
ब. आयोग कोणते कर्तव्य पार पाडील ?
क. चौकशीच्या संबंधातील अधिकार
ड. वरील अधिकारांचेसाठी मानवी हक्क आयोगाकडे असणारे अधिकार



Scanned by CamScanner

प्रकरण VII : मानवी हक्क आयोगाची कार्यपद्धती ——— ४४ - ४६
अ. तक्रारींची चौकशी
ब. चौकशीनंतरची उपाययोजना
क. सशस्त्र दलाबाबतीत कार्यपद्धती
ड. आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल

प्रकरण VIII : भारतीय संविधान व मानवी हक्क ——— ४७ - ५२
अ. संविधान तरतुदी
ब. राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची तत्त्वे
क. मानवी हक्क जाहीरनामा
ड. विधेयक
इ. इस्लामिक जाहीरनामा
फ. स्त्रियांचे हक्क
ग. बालकांचे हक्क
ह. अपंग व्यक्ती
य. वयस्क व्यक्ती
ज. निराधार व्यक्ती

प्रकरण IX : भारतीय संविधानाने दिलेले भाषण व
इतर स्वातंत्र्य व मुलभूत कर्तव्ये ——— ५३ - ५५
अ. भारतीय संविधानाने दिलेले भाषण व इतर स्वातंत्र्य
ब. मुलभूत कर्तव्ये

प्रकरण X : भारतीय दंड संहिता/क्रिमीनल प्रोसिजर कोड
अन्वये सामान्य नागरिकांसाठी असणारे मुलभूत हक्क ——— ५६ - ६०
अ. आरोपी असल्यास त्याला उपलब्ध असणारे हक्क
ब. जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण
क. अटक व स्थानबद्धता यांच्यातून संरक्षण
ड. अपव्यापार आणि वेठ यांना मनाई
इ. बालकांना कामाला ठेवण्यास मनाई
फ. अल्पसंख्यांकाचे हित संरक्षण
ग. अल्पसंख्याकाचा शैक्षणिक अधिकार



Scanned by CamScanner

प्रकरण XI : भारतीय दंड संहिता/क्रिमीनल प्रोसिजर कोड
अन्वये असणारे बाल व स्त्रीयांविषयीचे कायदे ———— ६१ - ६८
१. पुराव्याचे गृहितक
२. गर्भस्त्राव घडवून आणणे
३. स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भस्त्राव घडवून आणणे
४. गर्भस्त्राव घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेल्या कृतीमुळे मृत्यू घडून येणे
५. मूल जिवंत जन्माला येण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा जन्मानंतर त्याचा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली कृती
६. बालकास उघड्यावर टाकणे
७. मृतदेहाची गुप्तपणे विल्हेवाट लावून अपत्यजन्माची लपवणूक करणे
८. स्त्री विनयभंग
९. वेश्या व्यवसाय प्रयोजन
१०. वेठबिगारी
११. बलात्कार
१२. फारकत कालावधीत पत्नीशी संभोग
१३. हवालातील स्त्रीशी संभोग
१४. अधिक्षकाने केलेला संभोग
१५. रूग्णालयातील स्त्रीशी संभोग
१६. अनैसर्गिक अपराध
१७. औरसतेचा पुरावा

प्रकरण XII : भारतीय दंड संहिता/क्रिमीनल प्रोसिजर
कोड अन्वये विवाहासंबंधीचे अपराध ———— ६९ - ७२
१. फसवणूक
२. पहिली पत्नी असताना ( घटस्फोट झाला नसताना ) पुन्हा विवाह करणे
३. विवाहित स्त्रीस पळवून नेणे
४. क्रूर वागणूक देणे
५. पोटगी निर्वाहाचा आदेश



Scanned by CamScanner

प्रकरण XIII : भारतीय दंड संहिता/क्रिमीनल प्रोसिजर
कोड अन्वये अपराधींसाठी/आरोपींसाठीचे कायदे व हक्क - ७३ - ७९
१. बचावाचा हक्क
२. कायदेविषयक साहाय्य
३. न्यायालय खुले असणे
४. न्यायालयात कैद्याची ने-आण
५. आरोपी समक्ष पुरावा घेणे
६. संपरिक्षेचे उपबंध
७. अन्वेषण
८. व्यक्तींनी आयोगाकडे केलेली निवेदने
९. गैरन्यायिक परिणाम होण्याची शक्यता असलेल्या व्यक्तीला बाजू मांडण्याची संधी देणे

प्रकरण XIV : अटकेतील आरोपीसाठीचे संविधानिक
तरतूदीनुसार मार्गदर्शक कायदे ———— ८० - ८४
१. मार्गदर्शक कायदे
२. प्रसूत महिलेस अटक
३. अटकेतील व्यक्तीचा छळ
४. न्यायीक चौकशी
५. स्थानबद्धता पुरेसे कारण
६. सर्वसाधारण तत्त्वे
७. अपूर्ण तपास
८. आरोपी समक्ष हजर राहाणे

प्रकरण XV : वाजवी कारणाशिवाय आरोप
केल्याबद्दल भरपाई ———— ८५ - ८६

प्रकरण XVI : भारतीय दंड संहिता/क्रिमीनल प्रोसिजर कोड
अन्वये ओळख परेड ———— ८७ - ९१
१. ओळख परेड कोणास घेता येईल
२. ओळख परेडचे कामी मार्गदर्शक सूचना
३. ओळख परेड कशी घ्यावी



Scanned by CamScanner

प्रकरण XVII : स्वकबुली - अधिकारीता ———— ९२ - ९६
अ. स्वकबुली बाबतच्या मार्गदर्शक सूचना
ब. स्वकबुली तुरूंग अधिक्षकास कळविणे
क. स्वकबुली नंतर आरोपीची रवानगी
ड. पोलिसांनी जबाबाच्या प्रती घेणे
इ. अधिकाराचा दुरूपयोग
फ. प्रलोभन धमकी किंवा वचन याद्वारे मिळवलेली कबुली-जबाब फौजदारी कार्यवाही केव्हा असंबंद्ध
ग. कोणतेही प्रलोभन दाखवायचे नाही.

प्रकरण XVIII : मानवी हक्क न्यायालये, अनुदान व लेखापरिक्षण ———— ९७ - १००
१. न्यायचौकशी वेगाने होण्यासाठी
२. विशेष सरकारी वकील
३. केंद्र शासनाकडून अनुदाने
४. राज्य शासनाकडून अनुदाने
५. लेखे व लेखा परीक्षा
६. राज्य आयोगाचे लेखे व लेखा परीक्षा

प्रकरण XIX : केंद्र/राज्य सरकारचे नियम करण्याचे अधिकार ———— १०१ - १०४
अ. केंद्र सरकारचे नियम करण्याचे अधिकार
ब. भूतलक्षी प्रभावाने नियम करण्याचे अधिकार
क. राज्य शासनाचे नियम करण्याचे अधिकार
ड. अडचणी दूर करण्याचे अधिकार

प्रकरण XX : मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा, १९४८ ची २९ आर्टिकल्स ———— १०५ - १११

प्रकरण XXI : नागरी आणि राजकीय हक्कांवरील आंतरराष्ट्रीय नियमावली, १९६६ ची ५३ आर्टिकल्स ———— ११२ - १३५



Scanned by CamScanner

प्रकरण XXII : आर्थिक, सामाजिक आणि
सांस्कृतिक हक्कांवरील आंतरराष्ट्रीय नियमावली,
१९६६ ची ३१ आर्टिकल्स —— १३६ -१४८

विशेष अतिरिक्त माहिती

१) मानवी हक्क आयोगाच्या तक्रारीबाबत माहिती —— २०
२) मानवी हक्क आयोगाकडे तक्रार दाखल करावयाची
असल्यास खालील बाबी तक्रारीत आवश्यक —— २०
३) मानवी हक्क आयोगाच्या कार्यकक्षेत मोडणाऱ्या
तक्रारी —— ५२
४) मानवी हक्क आयोगाच्या कार्यकक्षेत न मोडणाऱ्या
तक्रारी —— ५२
५) मानवी हक्क आयोगाकडे तक्रार करताना व
केल्यावर काय करावे —— ६०
६) मानवी हक्क आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीची
सद्य:स्थिती जाणून घ्यावयाची असल्यास —— ७९
७) नमुना १ - मूळ वस्तुस्थिती मिळवण्यासाठी
आयोगाची सूचना/नोटीस —— ८४
८) सुनावणीसाठी आपण आलेले असल्यास —— ९६
९) नमुना २ - समन्स —— १००
१०) नमूना ३ - अटकेचे वॉरंट —— १०४



Scanned by CamScanner

# प्रकरण १ : मानवी हक्क म्हणजे काय ?

## अ) मानवी हक्क :

मानवी हक्क हे नैसर्गिक न्यायतत्त्वांमधून निर्माण झाले आहेत. हे हक्क कोणत्या देशाच्या जोर जबरदस्तीने, किंवा कायद्याच्या चौकटीतून वा सामाजिक ऐक्यातून घटीत वा उद्वीत झाले नाही. ते प्रत्येक मनुष्याच्या जन्मासोबत आलेले आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

मानवी हक्काची मूळे ही इतिहासात पार पुरातनात रूजलेली दिसतात. मानवी हक्कांची संकल्पना ही आधुनिक नसल्याची कल्पना हे त्याच्या अभ्यासावरून लक्षात येते. मानवी हक्कांच्या संकल्पनेला दोन आधार आहेत. एक म्हणजे राष्ट्रीय व दुसरा म्हणजे आंतरराष्ट्रीय. विभिन्न देश व भिन्न काळात याचा प्रमुख आधार त्या त्या देशातील धर्माचरणावर आधारलेला आहे. दया, क्षमा ही त्याची प्रमुख अंगे आहेत. भारतात चार वेद व भगवद्‌गीता यांचा पगडा भारतीयांवर होता व आहे. त्यात काय न्याय आहे व काय अन्याय आहे हे सांगितलेले आहे. रोमन व ग्रीक कायद्यान्वये आंतरराष्ट्रीय कायद्याची तत्त्वे ही नैसर्गिक न्यायतत्त्वांना आधारभूत असावी असे वैशिष्ट आहे. विविध राष्ट्र वा राज्यांच्या संघटनांचा यावर जरी पगडा असला तरी त्याला विधी व्यवस्थेपासून थोडे स्वातंत्र्य आहे. मानवी हक्क हे कशावरही अवलंबून नाहीत व एखादी विधीव्यवस्था जर मानवी हक्काच्या दृष्टीने सकारात्मक नसेल तर तो कायदा निरर्थक असेल. इलिनोर रूझवेल्ट यांचे मते मानवाच्या अधिकारांची सुरूवात कशी व कोठून होते ? त्यांची स्थाने लहान लहान आहेत. घर, शेजारी अशा लहान स्थानापासून असल्याने ते वैश्विक स्तरावर दिसून येत नाही. तरी सुद्धा ते एका व्यक्तीचे



Scanned by CamScanner

विश्व आहे. त्या व्यक्तीचे घर, शेजार, मैदान, शाळा, महाविद्यालय, शेती किंवा कारखाने असे जिथे तो काम करतो अशी ठिकाणे आहेत. जिथे प्रत्येक स्त्रीपुरूष लहान मुलांना समान न्याय व समान संधी तसेच समान सन्मानाची आवश्यकता असते आणि या तिन्ही अधिकारांचा त्या त्या स्तरांवर अधिकार प्राप्त करून दिला गेला पाहिजे.

शिक्षण आणि मानव अधिकार यांचे अतूट नातं आहे. शिक्षित मानव हा आपल्या मुलभूत अधिकारांबाबत चांगला जागरूक असतो. अशिक्षित ( निरक्षर ) माणसाचं शोषण सहज केलं जातं व आपले शोषण होत आहे यांची जाणीवसुद्धा त्याला होत नाही.

## ब) मानवी हक्काबाबत इतिहास :

१६२८ मध्ये चार्लस् यांनी पहिली मानवाधिकार बाबतची याचिका मंजूर केली होती. त्यानुसार सभागृहाने जाहीरनामा काढून स्वातंत्र्याचे जतन केले होते. उदा. सभागृहाच्या परवानगीशिवाय कोणावरही कर लादले जाणार नाहीत. लवादान्वये कोणालाही तुरूंगात पाठवले जाणार नाही. शांतता काळात शस्त्र विधी आयोग लागू होणार नाही. एखाद्याला तुरूंगात पाठविले असेल तर त्याला जामिनावर सोडण्यात येईल अथवा मुक्त करण्यात येईल, वगैरे. त्यामुळे ही याचिका ही मानवाधिकार बाबतची हक्काची पहिली याचिका मानण्यात येते.

## क) संयुक्त राष्ट्र संघटनेची घोषणा :

संयुक्त राष्ट्र संघटना ही आंतरराष्ट्रीय संघटना जागतिक महायुद्धानंतर अस्तित्वात आली. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात शांती कायम राखण्यासाठी संयुक्त राष्ट्राची ती संकल्पना होती. संयुक्त संघटनेच्या सुरूवातीच्या ५८ सदस्य राष्ट्रांची त्यांच्या सगळयाच क्षेत्रात विविधता होती. विविध विचारधारांचे राष्ट्रे, त्यांच्या राजकीय संरचना, धार्मिक आणि संस्कृती भिन्नता असताना संयुक्त राष्ट्र संघटनेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले व सर्व सदस्य राष्ट्रांना मानव अधिकार व त्यांचे उद्देश कायम करण्याचा कार्यक्रम जाहीर केला. मानवी जीवन जगण्यासाठी असलेल्या मुलभूत अधिकारांच्या रक्षणासाठी मानवी समाज आणि शासनकर्त्यांनी नेहमी जागरूक असणे आवश्यक असल्याची भूमिका घेऊन संयुक्त राष्ट्र संघटनेने १० डिसेंबर १९४८ रोजी मानव अधिकारांबाबत जागतिक स्तरावर घोषणा केली. अर्थात असे असताना सुद्धा मानवाच्या मुलभूत अधिकारांची त्या त्या ठिकाणची शोषण



Scanned by CamScanner

प्रवृत्ती ही खुलेआम उल्लंघन करीत आहे. अरबी देशात आजही दास-दास्य-गुलामीची प्रथा वरवर छोट्या मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमातून हद्दपार झाली असेल, परंतु प्रत्यक्षात गुलामाची परंपरा ही काही जणांसाठी शाही रूबाब असतो व असल्या सनातनी बाबी ठेवण्याचा प्रयत्न आजतागायत होत आहे. त्याच बरोबर अनेक अतिरेकी व/वा नक्षलवादी संघटना आपली दहशत सामान्य माणसात जिवंत ठेवण्यासाठी शोषित वर्गाचे ज्याप्रमाणे शोषण करते ते पाहिले तर मनाचा थरकाप उडतो.

### ड) आपल्या देशात मानवी हक्क आयोगाची स्थापना :

स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात मानव अधिकार आयोगाची १९९३ साली स्थापना झाली. अर्थात स्थापना झाल्यानंतर या क्षेत्रात जनजागृती करण्याचे काम कासव गतीने का होईना होत आहे.

### इ) मानवी हक्कांबाबत सामाजिक स्थिती :

जगामध्ये एकूण गरीबीच्या एक तृतीयांश लोक हे एकट्या आपल्या देशात असून त्यामुळे सुद्धा मानव अधिकाराची प्रतारणा होऊ शकते. पाच वर्षाखालील बहुतांशी गरीब मुलांना व्यवस्थित आहार मिळत नाही. आणि १४ वर्षांपेक्षा कमी वयाचे एक तृतीयांश बालक बालमजूर म्हणून कार्यरत आहेत. या बालमजूरांपैकी बहुतांश मुले ही जीवघेण्या उद्योगधंद्यात कार्यरत आहेत. अनेक मुलांना पिण्याचे पाणी मिळत नाही. तर स्नानगृह व शौचालय आदी सुविधांपासून बहुतांशी गरीब वंचित आहेत. आश्चर्य वाटेल पण मुलींसाठी अनेक शाळांमध्ये शौचालय आदी सुविधा नसल्यामुळे शिक्षण मधेच सोडून देण्याचा निर्णय पालक मंडळी घेतात. या सर्व प्राथमिक आरोग्य सुविधा मिळत नाहीत आणि आजही त्याबाबत सरकार गंभीर नाही.

आज आपल्या देशात पोलिस व न्यायालयीन कोठडीत मृत्यू, बेकायदेशीर अटक, बलात्कार, महिलांसोबत अत्याचार, दहशतवादी घटना, मागासवर्गियांवर अन्याय अशा घटनांसारख्या तक्रारी मानव अधिकार आयोगाकडे केल्या जातात. प्रत्येक दिवशी तक्रारी होत नाहीत का ? होतात. परंतु ज्या काही तक्रारी करण्यात येतात त्या निकाली निघत नाहीत. सरकारी आकडेवारीनुसार १९९६ ते २००५ या दहा वर्षामध्ये मागासवर्गियांवर झालेल्या अत्याचारासंदर्भात ज्या तक्रारी आयोगाकडे करण्यात आल्या. त्यापैकी सर्वाधिक ४०.३८ टक्के घटना या उत्तर भागातील असून ७.३१ टक्के हे दिल्ली तर कर्नाटक-महाराष्ट्रात १.३९ टक्के प्रमाणात



Scanned by CamScanner

आहेत. ( देशातील उर्वरित राज्यात काही घडलेच नाही असे नव्हे. घटना घडल्या आहेत. 'परंतु त्याची शासन दरबारी नोंद नाही. ) न्यायालयीन कोठडीत मृत्यू पावण्याचे जास्त प्रमाण हे महाराष्ट्रात आहे. मानव अधिकार आयोगाच्या जनजागृतीमुळे त्क्रारीच्या संख्येत काही प्रमाणात घट होत आहे. असे असले तरी अन्याय व अत्याचारग्रस्त अशा सर्व घटनांची माहिती आयोगापर्यंत पोहचत नाही. आयोगाने सूचित केलेल्या सूचनांचे राज्य सरकारने सक्तीने पालन केले तर मानव अधिकाराचे संरक्षण शक्य आहे.

***

## मानवी हक्क आयोगाच्या तक्रारीबाबत माहिती

१) मानवी हक्क आयोगाकडे तक्रार करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही.

२) मानवी हक्क आयोगाकडे तक्रार करताना न्यायालयीन मुद्रांक तिकीट लागणार नाही.

३) मानवी हक्क आयोगाकडे करावयाची तक्रार ही मराठी, इंग्रजी वा हिंदी यापैकी कोणत्याही एका भाषेत असावी. ( महाराष्ट्रासाठी )

४) मानवी हक्क आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीची नोंदणी तीन दिवसांच्या आत होईल.

## आपणास मानवी हक्क आयोगाकडे तक्रार दाखल करावयाची असल्यास खालील बाबी आपल्या तक्रारीत अंतर्भूत असणे आवश्यक ठरते.

१) संपूर्ण नांव.

२) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता.

३) घटनास्थळ व कोणाविरूद्ध व कोणत्या लोकसवेक/विभागाविरूद्ध तक्रार केली आहे त्याची माहिती.

४) घटनेची तारीख व किती कालावधीत तक्रार केली आहे याची माहिती.

५) मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्याबाबतची विस्तृत माहिती.

६) आपली तक्रार कोणत्याही न्यायालय/न्यायाधिकरण आयोगाकडे प्रलंबित आहे का त्याची माहिती.



Scanned by CamScanner